**सत्यापण**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | **वसंत आप्पाजी श्रीरंबेकर,** |
| **वय** | – | ६४ वर्षे, |
| **व्यवसाय** | – | शेती, |
| **पत्ता** | – | मौजे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली. |

गैरअर्जदार क्र. १ या माझ्या भावाची पत्नी आहे व गैरअर्जदार क्र. २ हा माझ्या भावाचा मुलगा आहे. गैरअर्जदार क्र. ३ हा गैरअर्जदार क्र. १ चा भाऊ व गैरअर्जदार क्र. ४ हा तिचा भाचा आहे. माझ्या वडिलांचे नाव आप्पाजी यशवंत श्रीरंबेकर असे आहे. ते दि. ३०.०७.१९८९ रोजी मयत झाले आहेत व माझी आई सोनाबाई आप्पाजी श्रीरंबेकर या दि.२६.०२.२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. माझे वडिलांनी ते हयात असताना श्री बसवेश्वर को.ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, सांगली या सोसायटीमध्ये गट क्र. २५६ मधील प्लॉट क्र. ४ विकत घेतलेला होता. तो प्लॉट अंदाजे ५३२ चौ.मी. चा होता. माझे वडील वारल्यानंतर दि. ०८.११.१९८९ रोजी प्रतिज्ञापत्राने मी व माझे दोन भाऊ रमेश आप्पाजी श्रीरंबेकर व सुभाष आप्पाजी श्रीरंबेकर, तीन बहिणी मंगल उर्फ धोंडूबाई, कांचन व सरूताई व आई सोनाबाई यांचे नाव ७/१२ सदरी वारस म्हणून लागले होते.

काही दिवसांनी सदरील मिळकत ही सिटी सर्व्हेकडे वर्ग झाली व त्यावेळी मालमत्ता पत्रक बनवताना सिटी सर्व्हेला आमचे वडीलांचेच नाव लागले व इतर वारसांची

नावे लागली नाहीत. त्या सिटी सर्व्हेचा क्र. एक्स्टेन्शन सिटी सर्व्हे नं. ५४८७ असा होता. आम्ही सर्व भावंडे सन २०१६ पर्यंत एकत्रात राहण्यास होतो. सदर वारसांची ७/१२ ला झालेली नोंद सर्वांना माहिती होती. सन २०१६ मध्ये सुभाष विभक्त झाला व तो सन २०२३ मध्ये वारला. गैरअर्जदार क्र. ३ व ४ यांनी सदरील प्लॅाटची माहिती घेतली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी सुभाष हे आप्पाजी श्रीरंबेकर यांना एकमेव वारस होते असे प्रतिज्ञापत्र करून ते सिटी सर्व्हे ऑफिस येथे दिले. तेथे सदरील ॲफिडेव्हीटवरून गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्या नावांची नोंद झाली. सदरील गैरअर्जदार क्र. ३ यांनी सिटी सर्व्हे ऑफिसमधील वारस नोंदणीच्या कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार क्र. १ व २ हेच सुभाष यांचे वारस आहेत असे सांगितले होते. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी श्री बसवेश्वर को.ऑप. सोसायटी यांचेकडील त्यांना सभासद म्हणून घेण्यात यावे यासाठी अर्ज दिला. तेथे देखील त्यांनी ते दोघे आप्पाजी श्रीरंबेकर यांचे एकमेव वारस सुभाष श्रीरंबेकर यांचे वारस आहेत असे प्रतिज्ञापत्र दिले होते. त्या प्रतिज्ञापत्राच्या समर्थनाकामी गैरअर्जदार क्र. ३ व ४ यांनी त्यांना आवश्यक ती मदत केली होती.

सदरील मिळकतीवर गैरअर्जदार क्र. १ व २ यांचे नाव लागल्यानंतर त्यांनी ती मिळकत विकण्याचा प्रयत्न केला व सदरील मिळकतीबाबत पेपरमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्या जाहीर नोटीसला मी माझ्या वकीलांमार्फत आक्षेप नोंदवला होता. मी सदरील मिळकतीचा सिटी सर्व्हेच्या फेरफार आदेशाविरुद्ध अपील दाखल केलेले

आहे. सदरील अपीलादरम्यान गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी आमचे नाव लावण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही व त्यांच्याकडून झालेली चूक ही नजरचुकीने झाली आहे असे नोटरी करून ॲफिडेव्हीट करून दिलेले आहे. सदर प्रकाराबाबत मी पोलीस स्टेशन सांगली ग्रामीण व संजयनगर पोलीस स्टेशन, सांगली यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र पोलिसांनी मला न्यायालयात जाण्यास सांगितले. सदर प्रकाराबाबत मी पोलीस अधीक्षक सांगली यांचेकडे देखील तक्रारी अर्ज दिला होता. परंतु माझ्या तक्रारी अर्जावर कोणतीही कारवाई झालेली नाही. सदर प्रकरणात पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने मी न्यायालयात तक्रार दाखल केलेली आहे.

फिर्यादी/साक्षीदाराची सही

(वसंत आप्पाजी श्रीरंबेकर)

आधार नं. ३४४६ ४४९८ १३२१

ठिकाण–सांगली

दिनांक–०२/०३/२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत,

२/३/२६

**(रोहिणी सं. पाटील)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १)**

**सांगली.**